*सर्वोत्कृष्ट संस्थेसाठी कॉमनवेल्थ ऑफ लर्निंगच्या आंतरराष्ट्रीय गुणवत्ता पुरस्काराने दोन वेळा सन्मानित*
*मनुष्यबळ विकास मंत्रालय, नवी दिल्ली यांचे 'स्वच्छ कॅम्पस रँकिंग २०१९' मानांकन प्राप्त*

ज्ञानगंगा घरोघरी

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ

## (नॅक मानांकित 'अ' श्रेणी)

# विद्यापीठाच्या कुलगुरू पदासाठी शोध समितीद्वारे अर्ज मागविण्यात येत आहेत

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाची स्थापना महाराष्ट्र विधिमंडळ कायदा क्र. XX(1989)अन्वये झाली असून विद्यापीठाचे मुख्यालय नाशिक येथे आहे. विद्यापीठ परिसरास 'ज्ञानगंगोत्री' असे समर्पक नाव आहे. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ हे देशातील पाचवे मुक्त विद्यापीठ असून विद्यापीठाचे कार्यक्षेत्र संपूर्ण महाराष्ट्र राज्य आहे. या विद्यापीठाद्वारे वय, प्रवेश–पात्रता, ठिकाण तसेच शिक्षणाची गती यासारखे अडसर दूर करून समाजातील मोठ्या वर्गाला माफक शुल्कामध्ये शिक्षणाची संधी उपलब्ध करून दिली जाते, त्याद्वारे विद्यार्थ्यांना अध्ययन–अध्यापन प्रक्रियेद्वारा आंतरक्रियेची संधी प्राप्त होते. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ स्वयं–अर्थसहाय्यित असून, महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत कार्यान्वित आहे. या विद्यापीठास विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली या नियामक संस्थेच्या सेक्शन 12(B)नुसार मान्यता आहे.

मा. कुलपती तथा महाराष्ट्र राज्याचे मा. राज्यपाल यांनी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या कायद्यानुसार कुलगुरूंच्या पदासाठी यथोचित व्यक्तीची शिफारस करण्यासाठी तीन सदस्यीय समिती स्थापन केली आहे. सदर समितीद्वारे कुलगुरूंच्या पदासाठी विहित केलेली अर्हता आणि अनुभव या अटींची पूर्तता करणाऱ्या नामांकित शिक्षणतज्ज्ञांकडून नामनिर्देशने / अर्ज मागविण्यात येत आहेत. या पदासाठी आवश्यक असलेल्या अर्हता व अनुभव, इष्टतम अनुभव तसेच कौशल्ये व नैपुण्य याबाबतची आवश्यक ती तपशीलवार माहिती तसेच अर्जाचा नमुना यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या **www.ycmou.ac.in** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

या पदासाठी इच्छुक व्यक्तींनी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध असलेल्या नमुन्यानुसार आपली तपशीलवार माहिती, स्वतःच्या उमेदवारीबाबतचे दोन पानी समर्थन, विद्यापीठाकरिता दोन पानी भविष्यलक्षी योजना आणि स्वतःच्या कार्याची नीट ओळख असलेल्या तीन नामांकित व्यक्तींची नावे, संपर्क तपशील, संदर्भपत्रासह सादर करणे आवश्यक आहे. विद्यापीठे / संस्थांनादेखील या पदासाठी सुयोग्य व्यक्तींचे नामनिर्देशन करता येईल.

इच्छुक व्यक्तींनी विहित नमुन्यातील अर्जामधील माहिती भरून अर्हता व अनुभवाची कागदपत्रे जोडून एकूण चार प्रतींमध्ये टपालाद्वारे तसेच सॉफ्ट प्रत ई–मेलद्वारे समन्वय अधिकारी यांच्याकडे **दिनांक ३० सप्टेंबर २०२२** रोजी किंवा त्यापूर्वी पोहोचतील अशा रितीने पाठवावेत. कुलगुरू शोध समितीच्या कार्य व प्रक्रियेसंदर्भातील सर्व पत्रव्यवहार केवळ समन्वय अधिकारी यांच्याकडेच करावा. या संदर्भात कुलगुरू शोध समिती अध्यक्ष अथवा सदस्य यांच्याशी कोणीही थेट संपर्क करू नये. अंतिम दिनांकानंतर प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

| **समन्वय अधिकारी** | डॉ. संदीप मिश्रा, आय.आय.आय.टी., पुणे |
|---|---|
| **पत्ता** | इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी पुणे<br>सर्व्हे नं. ९/१/३, आंबेगाव बु., सिंहगड इन्स्टिट्यूट रोड,<br>पुणे – ४११ ०४१, महाराष्ट्र, भारत |
| **ई–मेल** | nodalofficerycmou@gmail.com |
| **भ्रमणध्वनी** | ९४३६३५९८२८ |

निवड यादीतील उमेदवारांना शोध समितीसोबत वैयक्तिक मुलाखतीसाठी बोलाविण्यात येऊ शकते. मात्र, किमान अर्हताधारक उमेदवारास मुलाखतीस बोलाविले जाण्याचा हक्क प्राप्त होतोच असे नाही.

**दिनांक :** ३१ ऑगस्ट २०२२

**अध्यक्ष**
**शोध समिती**

Badhan / A22_126